प्रेस नोट दिनांकः-१९/०८/२०१७

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गु.र.क्रं.३१२/१७ भा.द.वि.कलम ३६३ मधील फिर्यादी महिला सौ अमृता आखाडे वय २० वर्षे रा धानोरी पूणे यांचेकडे राहणारी त्यांची मावशी रत्ना मरोळ वय ३५ हिने घरगुती भांडणाचे कारणावरून काल दि.१८/०८/२०१७ रोजी सकाळी ५.३० वा.चे सुमारास फिर्यादी यांची ५ महिन्याची मुलगी नामे- आयेशा हिस कोणास काही न सांगता पळवुन घेवून गेलेने वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास श्री दिपक साकोरे, पोलीस उप-आयूक्त सो परि-४ पुणे व श्री वसंत तांबेस सहा.पोलीस आयूक्त सो खडकी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संगीता पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे व श्री दिलीप शिंदे, पोलीस निरीक्षक, यांनी तातडीने तपास सुरु केला. तसेच गुन्ह्यातील आरोपी बाई व लहान बाळाचे व्हिडीओचे स्क्रिन शॉटवरून फोटो काढून घेवुन तसेच आरोपी बाईचा मोबाईल फोन याचे सीडीआर/एसडीआर व लोकेशन प्राप्त केले असता, आरोपी बाई हिचे लोकेशन शिरगाव ता.मावळ जि.पुणे व सिध्दार्थनगर लोणावळा पुणे असे प्राप्त झाल्याने दोन टिम तयार करुन तपासकामी शिरगाव व लोणावळा या ठिकाणी पाठवुन आरोपी बाईचा व अपह्रत बाळाचा शोध घेता सायं.५.३० वा चे सुमारास आरोपी बाई हि बाळाला घेवुन चेन्नई एक्सप्रेस रेल्वे गाडीने तिचे मुळगाव तिरुपती बालाजी आंद्र प्रदेश येथे जात असल्याचे समजले. तेव्हा पुन्हा सदर आरोपी बाईचे मोबाईलचे लोकेशन प्राप्त करता, आरोपी बाई ही २०.१५ वा चे सुमारास खडकी गाव ता.दौंड जि.पुणे येथे असल्याचे समजले.

आम्ही लागलीच पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री दिलीप शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत चौगुले व पोलीस टीम यांना पुणे रेल्वे स्टेशन येथे पाठवून रेल्वे पोलीस नियंत्रण कक्ष येथील मा पोलीस अधिक्षक श्री बुधवंत सो यांचे सहकार्याने सोलापूर रेल्वे स्टेशन येथे वायरलेस मेसेजव्दारे गुन्ह्यातील आरोपी बाई व बाळाचे फोटो पाठवून व चेन्नई एक्सप्रेस रेल्वेचे सर्व बोगी चेक करण्यासंदर्भात माहिती दिली. त्यानंतर वेळोवेळी तेथील जीआरपी पोलीस यांचे संपर्कात राहुन रात्रौ १२.०० वा सोलापूर रेल्वे स्टेशन येथे सदरची आरोपी बाई व अपह्रत बाळ आयेशा वय ५ महिने हि तिचे कब्जात सुखरूप मिळुन आलेने आम्ही लागलीच पोलीस टीम सोलापूर या ठिकाणी पाठवुन सदर आरोपी बाई व अपह्रत बाळास ताब्यात घेण्यात आले असुन दाखल गुन्ह्याचा कसोशिने तपास करुन शिताफिने आरोपी बाईस व बाळास ताब्यात घेवुन १२ तासाचे आंत गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास संगीता पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री दिलीप शिंदे पोलीस निरीक्षकक्ष (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभिजीत चौगुले हे करीत असुन,पो.हवा दिनकर लोखंडे, सुनिल खंडागळे, पो.ना विनायक रामाणे, प्रविण भालचिम, पो.शि सुभाष आव्हाड, योगेश चांगण, मपोशि ज्योती खरात, व रुचिका जमदाडे यांनी व पुणे व सोलापूर रेल्वे पोलीस यांनी सदर गुन्हा उघडकीस आणणेकामी उत्कृष्ट कामगीरी केलेली आहे.